0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २१/०६/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३९/२०१२/जा.४१६, दिनांक २२/०६/२०१२, १०/०७/२०१२ व १३/०८/२०१२.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३८/२०१२/जा.४१७, दिनांक २२/०६/२०१२.

४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ चे प्राधिकापत्रधारक, सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट यांचे दिनांक ११/०९/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३९/२०१२/जा. ७५९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक :- ०९/११/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २३/११/२०११ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ पत्ता - सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट, दुकान क्र. १८, करमदास मार्केट व्हिलेज रोड, भांडूप, मुंबई - ७८ या दुकानाची परिशिष्ट अ नुसार संपूर्ण तपासणी घेतली असता, साठा नोंदवहीतील नोंदीपेक्षा ६६०० किलो तांदूळ आणि २०० किलो गहू अतिरिक्त असल्याचे आढळून आले. त्याबाबत अहवाल सदर दुकानाच्या प्राधिकारपत्रधारकाविरुध्द खातेनिहाय चौकशीसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/दक्षता/ई/प्र.क्र.१३३/२०११/पाच/जा.२६४० दिनांक १२/१२/२०११ अन्वये उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ कार्यालयास पाठविण्यात आला.

ई परिमंडळ कार्यालयाचे उपनियंत्रक शिधावाटप यांनी त्याअनुषंगाने अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ विरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करुन प्राधिकारपत्रधारकास कारणे दाखवा नोटीस बजावून दिनांक

२३/१२/२०११ रोजी दुपारी १२:०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली व त्या अनुषंगाने तपासणीमध्ये आढळून आलेल्या तांदूळ व गव्हाच्या अतिरिक्त साठ्याबाबत तसेच प्राधिकारपत्रधारकाने सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या खरेदी बिलाची आणि मालाची सखोल चौकशी करण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ या कार्यालयाकडून शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्र. ३०-ई, भांडूप यांना पत्र क्र. ईप/तपा/११८३/ खाचौ.३०९/जा.७३४०, दिनांक १९/१२/२०११ निर्गमित करण्यात येऊन अहवाल सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले.

प्राधिकारपत्रधारकाने सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या खरेदी बिलांच्या सत्यतेबाबत पडताळणी करण्याकरिता या कार्यालयाच्या फिरत्या पथकाने दिनांक ०५/०५/२०१२ रोजी मे. श्रीनिवास कॉर्पोरेशन व मे. पी.पी. ट्रेडर्स या संबंधित व्यापाऱ्यांकडे गव्हाच्या साठ्याबाबत तसेच मे. शिवराईस ट्रेडर्स या व्यापाऱ्याकडे तांदळाच्या साठ्याबाबत अधिक खातरजमा करण्याकरिता भेट दिली असता, गव्हाच्या साठा खरेदीच्या पुराव्यादाखल सादर केलेल्या बिलांमध्ये आक्षेपार्ह बाब पथकास आढळून आले नाही. तथापी, मे. शिवराईस ट्रेडर्स या आस्थापनेकडून तांदळाच्या साठा खरेदीच्या पुराव्यादाखल सादर करण्यात आलेल्या दिनांक २३/११/२०११ रोजीच्या बिल क्र. २३६७५ अन्वये प्रत्यक्ष भेट देऊन खातरजमा केली असता, सदर बिलामध्ये खाडाखोड असल्याचे पथकास निदर्शनास आले. मे. शिव राईस ट्रेडर्स यांनी सदर बिलात नमूद केलेली दिनांक २३/११/२०११ हा दिनांक त्यांनी नमूद केली नसल्याचे सांगितले. मात्र त्यांनी सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट ह्या नावे दिनांक २६/११/२०११ रोजी दिलेल्या बिलाची (क्र. २३६७५) छायांकित प्रत दाखवून सदर बिलानुसार ७०००.किलो तांदूळ दिनांक २६/११/२०११ रोजी दुकानदारास पोच केल्याचे सांगितले. याबाबत मे. शिवराईस ट्रेडर्सचे मालक यांनी लेखी निवेदन सादर केले आहे.

तरी सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट, दुकान क्र. १८, करमदास मार्केट व्हिलेज रोड, भांडूप, मुंबई - ७८ या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ च्या प्राधिकारपत्रधारकाने सुनावणीच्यावेळी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांना, त्यांच्या दुकानात असलेला अतिरिक्त तांदळाचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे सांगून तसेच तत्संबंधीचे खोटे बिल (दिनांक नमूद करुन) सादर करुन महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप आदेश, १९६६ या अन्वये त्यांना देण्यात आलेल्या प्राधिकारपत्राच्या अटींचा त्यांनी भंग करुन या कार्यालयाची व पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे स्पष्ट होत आहे.

अशाप्रकारे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ चे प्राधिकारपत्रधारक सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट ह्या संस्थेने अनधिकृतरित्या स्वतःच्या फायद्यासाठी शासन नियंत्रित दराचा तांदळाचा साठा

हा गैरमार्गाने प्राप्त करुन सदरचा साठा हा प्राधिकारपत्रधारकास नियत केलेल्या शिधाजिन्नसांच्या मंजूर नियतनापेक्षा जास्त साठा करुन तो शासन दरापेक्षा जास्त दराने अवैध विक्री करण्याच्या दृष्टीने तसेच शिधापत्रिकाधारकांना शिधाजिन्नसांपासून वंचित ठेऊन काळाबाजार करण्याच्या दृष्टीने साठवणूक केल्याने, त्यांनी जनतेची व पर्यायाने शासनाची फसवणूक केलेली असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधिताविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १०, २) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम ३ (अ), ४, ५ व ६ तसेच ३) बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल्ड, कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ३, ४, ५ व ६ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द भांडूप पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था.गु.क्र. ४९०/२०१२ दिनांक ११/०५/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | शासन नियंत्रित तांदळाचा साठा | ६६०० किलो | १,३२,०००/- |
| | | एकूण | १,३२,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १०/०७/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १०/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक ०७/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची अंतीम सुनावणी दिनांक ११/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ चे प्राधिकापत्रधारक, सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती दिपा प्रकाश साळवी यांनी

उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ चे प्राधिकापत्रधारक, सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती दिपा प्रकाश साळवी यांनी युक्तीवाद केला की, दिनांक २३/११/२०११ रोजी आपल्या कार्यालयाच्या फिरत्या पथकाने घेतलेल्या तपासणीत ६६०० किलो तांदूळ व २०० किलो गहू अधिक असल्याचे दर्शविले होते. सदरचा तांदूळ व गहू हा खुल्या बाजारातील विक्रीकरीता दुकानात स्वतंत्ररित्या पार्टीशन घालून स्वतंत्ररित्या ठेवण्यात आलेला होता. संबंधीत अधिकाऱ्यांना या बाबतची खरेदीची बिले दाखवूनही संबधित अधिकाऱ्यांनी भांडूप पोलिस स्टेशन येथे त्यांच्या दुकानाविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. सदर बाबत वस्तुस्थिती अशी आहे की, दिनांक १७/०८/२०११ रोजी महिला बचत गटाकरीता विशेष बाब म्हणून अ.शि.वा.दु.क्र. ३० ई १६५ कार्यान्वित झाले. दिनांक १७/०८/२०११ ते दिनांक २३/११/२०११ पर्यंत माहे सप्टेंबर २०११ - ६ क्विंटल, माहे ऑक्टोबर २०११ - २ क्विंटल, माहे नोव्हेंबर २०११ - ६ क्विंटल असा एकूण १४ क्विंटल तांदूळ हा शासन नियंत्रित जिन्नसाची आवक झालेली आहे. वास्तविक पाहता तपासणी अधिकाऱ्यांनी खुल्या बाजारातील विक्रीकरीता वाशी मार्केट येथून आयात केलेला ६६०० किलो तांदूळ व २०० किलो गहू हा अतिरिक्त आढळलेला माल म्हणून जमा करणे व जीवनावश्यक वस्तू कायद्याखालील अंतर्गत गुन्हा दाखल करणे तसेच गुन्ह्याच्या अनुषंगाने सदरचा अतिरिक्त माल जप्त करणे व जप्त मालाची त्यानंतर विल्हेवाट लावणे हे अयोग्य होते व शासनाच्या महिलांच्या सबळीकरणाकरीता आखलेल्या धोरणाच्या विरोधात होते. एकंदरीत १४०० किलो तांदूळाची शासनाकडून आवक असताना ६६०० किलो तांदूळ अतिरिक्त आहे असे पुरावे सादर करुनही म्हणणे विसंगत आहे. सदरचा तांदूळ ६६०० किलो व गहू २०० किलो हा आपल्या आदेशाच्या अनुषंगाने नजीकच्या दुकानात शासन नियंत्रित दराने विक्री करण्यात आला असून त्याद्वारे जमा झालेली रक्कम ही भांडूप पोलिस ठाणे क्रिमिनल डिपॉझिअ जमा करण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्त केलेली आहे. सदरचा माल हा महिला बचत गटातील आम्हा महिलांनी पै-पै जमा करुन निधी गोळा करुन जमविलेल्या भांडवलातून वाशी येथील ए.पी.एम.सी.च्या धान्य बाजारातून खरेदी केलेला होता. सदरच्या मालाच्या विल्हेवाटीची रक्कम शासन जमा न करता त्यांना मिळावी असे ओदश कृपया पारीत करण्यात यावे. वरील बाजूच्या सहानुभूतीपूर्वक विचार



000

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD O... MUMB...

करुन जप्त मुद्देमालाचे पैसे परत करण्यात यावे. तसेच सदरहू दुकान हे त्यांना समस्त महिला बचत गटातील महिलांच्या उदरनिर्वाहाचे साधन असल्याने सदरचे दुकान पूर्ववत सुरु करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २३/११/२०११ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी दुकान क्र. १८, करमदास मार्केट व्हिलेज रोड, भांडूप, मुंबई - ७८, सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट या नावे असलेले अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ या दुकानाची परिशिष्ट अ नुसार संपूर्ण तपासणी घेतली असता, साठा नोंदवहीतील नोंदीपेक्षा ६६०० किलो तांदूळ आणि २०० किलो गहू अतिरिक्त असल्याचे आढळून आले. त्याबाबत अहवाल सदर दुकानाच्या प्राधिकारपत्रधारकाविरुध्द खातेनिहाय चौकशीसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/दक्षता/ई/प्र.क्र.१३३/२०११/पाच/जा.२६४० दिनांक १२/१२/२०११ अन्वये उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ कार्यालयास पाठविण्यात आला. त्याअनुषंगाने अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ विरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करुन प्राधिकारपत्रधारकास कारण दाखवा नोटीस बजावून दिनांक २३/१२/२०११ रोजी संबंधित परिमंडळ कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली व त्या अनुषंगाने तपासणीमध्ये आढळून आलेल्या तांदूळ व गव्हाच्या अतिरिक्त साठ्याबाबत प्राधिकारपत्रधारकाने सुनावणीच्यावेळी खरेदी बिले सादर केली. सदर खरेदी बिलांच्या सत्यतेबाबत पडताळणी करण्याकरिता या कार्यालयाच्या फिरत्या पथकाने ०५/०५/२०१२ रोजी मे. श्रीनिवास कॉर्पोरेशन व मे. पी.पी. ट्रेडर्स या संबंधित व्यापाऱ्यांकडे गव्हाच्या साठ्याबाबत तसेच मे. शिवराईस ट्रेडर्स या व्यापाऱ्याकडे तांदळाच्या साठ्याबाबत अधिक खातरजमा करण्याकरिता भेट दिली असता, गव्हाच्या साठा खरेदीच्या पुराव्यादाखल सादर केलेल्या बिलांमध्ये आक्षेपार्ह बाब पथकास आढळून आले नाही. तथापी, मे. शिवराईस ट्रेडर्स या आस्थापनेचे तांदळाच्या साठा खरेदीच्या पुराव्यादाखल सादर करण्यात आलेल्या दिनांक २३/११/२०११ रोजीच्या बिल क्र. २३६७५ अन्वये प्रत्यक्ष भेट देऊन खातरजमा केली असता, सदर बिलामध्ये खाडाखोड असल्याचे पथकास निदर्शनास आले. मे. शिव राईस ट्रेडर्स यांनी सदर बिलात नमूद केलेली दिनांक २३/११/२०११ हा दिनांक त्यांनी नमूद केला नसल्याचे सांगितले. मात्र त्यांनी सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट ह्या नावे दिनांक २६/११/२०११ रोजी दिलेल्या बिलाची (क्र. २३६७५) छायांकित प्रत

दाखवून सदर बिलानुसार ७००० किलो तांदूळ दिनांक २६/११/२०११ रोजी दुकानदारास पोच केल्याचे सांगितले. याबाबत मे. शिवराईस ट्रेडर्सचे मालक यांनी लेखी निवेदन सादर केले आहे. तरी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ च्या प्राधिकारपत्रधारकाने सुनावणीच्यावेळी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांना, त्यांच्या दुकानात असलेला अतिरिक्त तांदळाचा साठा हा खुल्या बाजारातील असल्याचे सांगून तसेच तत्संबंधीचे खोटे बिल (दिनांक नमूद करुन) सादर करुन महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप आदेश, १९६६ या अन्वये त्यांना देण्यात आलेल्या प्राधिकारपत्राच्या अटींचा त्यांनी भंग करुन या कार्यालयाची व पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन सदरचा तांदळाचा साठा जप्त करण्यात आला.

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ चे प्राधिकापत्रधारक, सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती दिपा प्रकाश साळवी यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, दिनांक २३/११/२०११ रोजी आपल्या कार्यालयाच्या फिरत्या पथकाने घेतलेल्या तपासणीत ६६०० किलो तांदूळ व २०० किलो गहू अधिक असल्याचे दर्शविले होते. सदरचा तांदूळ व गहू हा खुल्या बाजारातील विक्रीकरीता दुकानात स्वतंत्ररित्या पार्टीशन घालून स्वतंत्ररित्या ठेवण्यात आल्याचे सांगून संबंधीत अधिकाऱ्यांना या बाबतची खरेदीची बिले दाखवूनही संबधित अधिकाऱ्यांनी भांडूप पोलिस स्टेशन येथे त्यांच्या दुकानाविरुध्द गुन्हा दाखल केल्याचे सांगितले. दिनांक १७/०८/२०११ ते दिनांक २३/११/२०११ पर्यंत माहे सप्टेंबर २०११ - ६ क्विंटल, माहे ऑक्टोबर २०११ - २ क्विंटल, माहे नोव्हेंबर २०११ - ६ क्विंटल असा एकूण १४ क्विंटल तांदूळ हा शासन नियंत्रित जिन्नसाची आवक झालेली आहे. वास्तविक पाहता तपासणी अधिकाऱ्यांनी खुल्या बाजारातील विक्रीकरीता वाशी मार्केट येथून आयात केलेला ६६०० किलो तांदूळ व २०० किलो गहू हा अतिरिक्त आढळलेला माल म्हणून जमा करणे, जीवनावश्यक वस्तू कायद्याखालील अंतर्गत गुन्हा दाखल करणे तसेच गुन्ह्याच्या अनुषंगाने सदरचा अतिरिक्त माल जप्त करणे व जप्त मालाची त्यानंतर विल्हेवाट लावणे हे अयोग्य असल्याचे सांगून एकंदरीत १४०० किलो तांदूळाची शासनाकडून आवक असताना ६६०० किलो तांदूळ अतिरिक्त आहे असे पुरावे सादर करुनही म्हणणे विसंगत आहे. सदरचा माल हा महिला बचत गटातील आम्हा महिलांनी पै-पै जमा करुन निधी गोळा करुन जमविलेल्या भांडवलातून वाशी येथील ए.पी.एम.सी.च्या धान्य बाजारातून खरेदी केलेला होता. वरील बाजूच्या सहानुभूतीपूर्वक विचार करुन जप्त मुद्देमालाचे पैसे परत करण्यात यावे. तसेच सदरहू दुकान हे त्यांना समस्त महिला बचत गटातील महिलांच्या उदरनिर्वाहाचे साधन असल्याने सदरचे दुकान पूर्ववत सुरु करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती केली आहे.

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई-१६५ या दुकानाच्या दिनांक २३/११/२०११ रोजी घेण्यात आलेल्या संपूर्ण तपासणीत ६६०० कि.ग्रॅ. तांदूळ व २०० कि.ग्रॅ. गव्हाचा साठा हा साठा नोंदवहीपेक्षा अतिरिक्त असल्याचे तसेच त्यापैकी तांदळाच्या बाचक्यांवर भारतीय खाद्य निगम असे नमूद असल्याचे पथकास आढळून आले. तद्नंतर उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांनी सदर दुकानाविरुध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करुन ठेवण्यात आलेल्या सुनावणीत नमूद दुकानाचे प्राधिकारपत्रधारक सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती दिपा प्रकाश साळवी यांनी तपासणीत आढळून आलेल्या तांदूळ व गव्हाच्या अतिरिक्त साठा हा एपीएमसी मार्केट, वाशी येथील विविध व्यापाऱ्यांकडून खरेदी केल्याचे सांगून पुराव्यादाखल सिध्दिविनायक महिला मंडळ या नावे खरेदी बिले सादर करुन सदरचा साठा हा त्यांनी खुला बाजारातील साठा असल्याचे भासवून या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. तथापी, सादर केलेल्या खरेदी बिलांची प्रत्यक्ष स्थळभेट देऊन पथकाने सत्यता पडताळणी केली असता, मे. शिव राईस ट्रेडर्स यांचे बिल क्र. २३६७५ या बिलाच्या तारखेमध्ये खाडाखोड असल्याचे पथकास निदर्शनास आले. सदर बिलामध्ये दिनांक २३/११/२०११ ही तारीख मे. शिव राईस ट्रेडर्स यांनी नमूद केले नसल्याचे सांगून त्यांनी प्रत्यक्षात सिध्दिविनायक महिला मंडळ या नावे दिनांक २६/११/२०११ रोजी दिलेल्या बिल क्र. २३६७५ ची स्थळप्रत दाखवून सदर बिलानुसार ७००० किलो तांदूळ त्याच दिवशी म्हणजेच दिनांक २६/११/२०११ रोजी नमूद दुकानात पोच केल्याचे सांगून तसा लेखी जबाब दिला आहे. सबब, तपासणीच्या वेळी जप्त करण्यात आलेला सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन अनुदानित दराचा भारतीय खाद्य निगमचा शिक्का असलेला तांदळाचा अतिरिक्त आढळून आलेला ६६०० किलो साठा हा प्राधिकारपत्रधारक सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती दिपा प्रकाश साळवी यांनी अवैध मार्गाने खरेदी करुन स्वत:च्या फायद्यासाठी विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. यावरुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई-१६५ चे प्राधिकारपत्रधारक यांनी महाराष्ट्र अन्नधान्य शिधावाटप आदेश, १९६६ या आदेशाचे तसेच त्या अन्वये त्यांना दिलेल्या प्राधिकारपत्रामधील अटींचा भंग केल्याचे निष्पन्न होत असल्याने शासनाने प्राधिकारपत्रधारक म्हणून त्यांना नेमुन दिलेली जबाबदारी पार पाडतांना केलेल्या गैरकृत्याने त्यांनी शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, जप्त तांदळाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले दिनांक २२/०६/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये भांडूप पोलिस

0008

ठाणे, मुंबई येथे स्था.गु.क्र. ४९०/२०१२ दिनांक ११/०५/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

प्रस्तूत प्रकरणी या कार्यालयाचे दिनांक २२/०६/२०१२ रोजी पारीत करण्यात आलेले अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३०-ई/१६५ चे प्राधिकापत्रधारक, सिध्दिविनायक महिला स्वयंसहायता बचत गट

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भांडूप पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भांडूप पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा (दुरध्वनी क्र. ०२२-२४१२५४९५) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
५) कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, दुकान शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
६) कार्यासन अधिकारी, का.क्र. २, मागणी शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
७) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc